# पक्षांमधील बर्ड फ्ल्यु : लक्षणे व उपाय

प्रा. के. एल. जगताप
विषय विशेषज्ञ (पशू संवर्धन व दुग्धशास्त्र)

डॉ. अजय किनखेडकर
कार्यक्रम समन्वयक

कृषि विज्ञान केंद्र, खामगाव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

बर्ड फ्ल्यु हा विषाणूजन्य आजार असून तो संसर्गजन्य व घातक असा आहे. हा आजार कोंबडीवर्गीय व बदकवर्गीय पक्षांमध्ये आढळतो. या आजाराला एव्हियन इंफ्लूएंझा या नावाने ओळखले जाते. हा आजार प्रथम इटलीमध्ये सन १९०० व्या दशकात आढळला गेला. त्यानंतर सन १९६१ मध्ये दक्षिण आफ्रिकेत या आजाराने हाहाकार माजवला त्यामुळे लाखो पक्षी संक्रमित झाले. हे शांत होत नाही तोच १९८३ मध्ये व्हर्जिनिया मध्ये कितीतरी लाख कोंबड्यांना मारले गेले. जगामध्ये हाँगकाँग या देशात बर्ड फ्ल्यु हा आजार माणसांना देखील होतो हि जगातील पहिली घटना सन १९९७ मध्ये झाली याची पुष्टी मिळाली कारण तेथे १८ जणांना हा आजार झाला व त्यातील ५ जणांचा मृत्यू झाला, त्याचबरोबर पक्षांना देखील हा आजार होऊन १५ लाख कोंबड्या मारण्यात आल्या. विषाणूचा नवीन स्ट्रेन एच ७ एन ७ यामुळे सन २००३ साली नेदरलंड मध्ये ८४ जणांना बाधा होऊन एकाचा मृत्यू झाला. २०१९ साली १५५० जणांना एच ७ एन ९ या नवीन स्ट्रेनची बाधा होऊन ६०० जणांचा मृत्यू झाला.



भारतामध्ये या आजाराची नोंद प्रथम २००६ साली महाराष्ट्र गुजरात सिमेवरील असलेल्या नावापुर मध्ये होऊन तब्बल २.५ लाख कोंबड्या मारण्यात आल्या, तसेच ५ लाखापेक्षा जास्त कोंबड्यांची अंडी नष्ट करण्यात आली. आपल्या देशात हा आजार माणसांना झाला आहे हि आजपर्यंत नोंद नाही. नोंद फक्त विदेशामध्ये झालेली आढळते.

### एच व एन याविषयी थोडक्यात माहिती:

- एच म्हणजे हेमाग्युलेटीन होय. याचे १८ प्रकार आहेत.
- एन म्हणजे न्यूरामीनिडीज होय. याचे देखील ११ प्रकार आहेत.
- एच व एन हे विषाणूचे प्रोटिन स्ट्रेन आहेत. या प्रकारातील एच ५, एच ७ व एच १० हे माणसांचा मृत्यू होण्यास कारणीभूत ठरत आहेत आणि याच कारणामुळ एच ५ एन ९ हा स्ट्रेन मानवासाठी धोकादायक ठरू शकतो.

### प्रसाराची कारणे:

- हा आजार विषाणूमुळे होत असल्याकारणाने याचा प्रसार विषाणूमुळेच होतो.
- बाधित पक्षांच्या नाक व डोळ्यामधून स्त्रवणारा स्त्रावामधून या आजाराचा प्रसार होतो.
- तोंडामधील लाळेमधून देखील या आजाराचा प्रसार होतो.
- खाद्य, पाणी याद्वारे देखील आजाराचा प्रसार होतो.
- विष्टेमधून देखील याचा संसर्ग होतो.
- संक्रमित पक्षाने पंख झटकले तरी या आजाराचा विषाणू इतर ठिकाणी पसरतो.

### लक्षणे:

- बाधित पक्षांना अतिसार होतो.
- श्वासोश्वास घेताना त्रास होतो.
- संक्रमित कोंबड्या या अंडी देतात पण अंड्याचे पांढरे कवच लवचिक / नरम असतात.
- डोक्यावरील तुरा हा काळपट निळसर पडतो.
- या आजारग्रस्त पक्षांना ताप येतो.
- गळ्यामध्ये सूज येते.

### उपाय:

- टॅमीफ्ल्यू नावाच्या गोळ्या यावर प्रभावशाली आहेत.
- रेलेंझा, रॅपीवब प्रकारच्या गोळ्या देखील डॉक्टर देतात.
- वरील प्रकारच्या गोळ्या या डॉक्टरांच्या मदतीनेच घ्याव्यात कारण यामुळे दुष्परिणाम देखील होण्यास मदत होईल.
- मेलेले पक्षी हे खोल खड्ड्यात नेऊन टाकावेत व त्यावर चुन्याची पावडर टाकून पुरून टाकाव्यात.
- ज्या भागात याचा संसर्ग झाला आहे त्याच्या सभोवतालच्या १० किमी पर्यंतचा भाग अलर्ट झोन म्हणून घोषित करावा.

### माणसामध्ये कशाने प्रसार होतो:

- संक्रमित कोंबड्यांच्या संपर्कात आल्यास माणसास बाधा होऊ शकते.
- याचे विषाणू हे नाकाद्वारे, डोळ्यावाटे, तोंडावाटे, लाळेवाटे प्रसार होऊ शकतो.
- बाधित पक्षांचे मांस व अंडे हे कच्चे सेवन केल्यास हा

हा आजार होऊ शकतो.

लक्षणे:

- शरीराचे तापमान हे जास्त होते.
- डोके दुखण्याचा त्रास होतो.
- गळ्यात सूज येते, श्वासोश्वासास अडथळा येतो. घसा देखील खवखव करतो.
- खोकला येतो.
- मळमळ, उलटी सारखा त्रास होतो.

उपचार:

- संक्रमित कोंबड्यांचा संपर्क टाळला पाहिजे.
- कुक्कुटपालनास भेट शक्यतो टाळावी.
- मांस व अंडी खाताना / सेवन करताना ते पुर्णपणे निर्जंतुक करूनच, चांगले शिजवूनच सेवन केले पाहिजे.
- या आजाराची व कोरोना आजाराची लक्षणे यात साम्य असल्यामुळे एस एम एस चा वापर केला पाहिजे म्हणजेच हात हे साबनाने / सॅनिटायजरने धुतले पाहिजेत, याचा प्रसार हा नाकावाटे, तोंडावाटे, लाळेवाटे होत असल्यामुळे मास्क देखील घातलाच पाहिजे. संक्रमित कोंबड्यांच्या संपर्कात येऊ नये / संपर्क हा टाळलाच पाहिजे.

वरील लेखाद्वारे या आजाराची माहिती मिळण्यास तसेच कशा पद्धतीने प्रतिबंध केला पाहिजे याविषयी माहिती मिळण्यास मदतच होते.

(संपर्क: +९१ ९८८१५३४१४७)

★ ★ ★

## हळद शिजविणे, वाळविणे व पॉलिश व प्रतवारी करणे

हळद शिजविणे: हळद शिजवताना सच्छिद्र ड्रमचा वापर करून हळद शिजविणे फायदेशीर ठरते. या पद्धतीमध्ये डिझेलच्या बॅरलपासून बनविलेले १.५ फूट उंचीचे व २ फुट व्यासाचे ४ ते ५ सच्छिद्र ड्रम ५ फुट व्यासाच्या मोठ्या कढईमध्ये पाणी ओतून पाण्याची आतील पातळी ड्रमच्या उंचीच्या वर ४ ते ५ से.मी. इतकी ठेवली जाते. नंतर ड्रम जाड गोणपाटाने झाकून घेतले जातात. या पद्धतीने हळद फक्त २५ ते ३० मिनिटात चांगल्या प्रकारे शिजते. त्यावेळी पाण्याचे तापमान ९० डी. ते १०० डी. सेंटीग्रेट असते. हळद शिजल्यानंतर चुलवानामध्ये इंधन टाकण्याचे प्रमाण कमी केले जाते. त्यामुळे आपोआप पाण्याचे तापमान कमी होते. शिजलेल्या हळदीचे ड्रम लांब बांबूच्या सहाय्याने २ कड्यामध्ये असकून २ व्यक्तिंकडून सहजासहजी उचलून वाळविण्यासाठी खळ्यामध्ये अथवा कठीण जागेवर टाकावे. असे रिकामे झालेले ड्रम पुन्हा कच्च्या हळदीने भरून काहीलीतील गरम पाण्यात ठेवतात.

पाण्याची पातळी पुन्हा ठेवलेल्या ड्रमवर ४ ते ५ सेंमी राहील इतकी ठेवली जाते. ठेवलेले ड्रम वरीलप्रमाणे गोणपाटात झाकतात व परत इंधन टाकून त्याच पद्धतीने हळद शिजविली जाते.

वरील पद्धीतमध्ये एका ड्रममध्ये सुमारे ५५ ते ६० किलो याप्रमाणे एका वेळी जवळ जवळ २५० ते ३०० किलो हळद शिजविली जाते. प्रत्येक वेळी जुन्या पद्धतीप्रमाणे गरम पाणी काढून टाकणे आणि पुन्हा नवीन पाणी टाकणे ही प्रक्रिया करावी लागत नाही. दुसरे हळद भरलेले ड्रम काहिलीत ठेवलेले असता पाण्याचे तापमान ८३ डी. ते ८४ डी. सेंटीग्रेडपर्यंत खाली येते. त्यामुळे पहिले ड्रम काढल्यानंतर दुसऱ्या घेतलेल्या ड्रममधील हळद शिजविण्यासाठी लागणारे इंधन हे तापमान ८४ ते १०० डी. सेंटीग्रेटपर्यंत वाढविण्यासाठी लागेल इतकेच असते. त्यामुळे इंधनाची बचत होते. तसेच सर्व हळद एकसारखी शिजली जाते. शिजताना पाण्यातील माती हळकुंडावर न बसता काहिलीत जमा होते. त्यामुळे मातीविरहीत स्वच्छ धुतलेली हळद मिळते. अशा हळदीस वाळविल्यानंतर पॉलिश केल्यास आकर्षक रंग प्राप्त होतो आणि उताराही चांगला मिळतो. अशा हळदीची गुणवत्ता चांगली असल्याने बाजारभावही चांगला मिळतो. अशा या वेळ, इंधन व मजुरी यांची बचत करणाऱ्या व किफायतशीर नफा मिळवून देणाऱ्या सुधारीत तंत्राचा पारंपारिक पद्धतीत थोडाफार खर्च करून अवलंब केल्यास नक्कीच फायदा होईल.

हळद वाळविणे: हळद शिजविल्यानंतर सुरुवातीचे ४ ते ५ दिवस ३ ते ४ इंचापेक्षा मोठा थर देऊ नये. मोठा थर दिल्यास हळकुंड वाळण्यास उशीर लागतो. त्याचप्रमाणे हळकुंड काळी पडतात. हळकुंडे साधारणपणे ८ ते १० दिवस उन्हात चांगली वाळवावी, वाळलेली हळद पाण्याने भिजाणार नाही याची दक्षता घ्यावी. हळद शक्यतो ताडपत्रीवरती किंवा कठीण जागेवरती वाळवावी, त्यामुळे मजुरीवरती होणारा खर्च कमी होईल.

पॉलिश व प्रतवारी करणे: वाळलेली हळद विक्रीसाठी मार्केटला पाठविण्यापूर्वी पॉलिश करणे अत्यंत आवश्यक असते. हळद पॉलिश करणे म्हणजे वाळलेल्या हळकुंडावरची खरबरीत साल काढून टाकणे होय. पॉलिश करण्यासाठी ऑईलच्या बॅरलला १.२ ते २ इंच अंतरावरती छन्नीने भोक पाडून हा बॅरल लोखंडी कन्यावरती फिट करून हा पॉलिश ड्रम स्टॅंडवर बसवून फिरविल्यास हळकुंडाची वरची साल निघून जाते व हळद पॉलिश होते. हेच काम १ एच. पी. सिंगल फेज मोटारवरती चालणाऱ्या लाकडी अष्टकोणी ड्रमवरतीच करता येते. हळद पॉलिश केल्यानंतर प्रतवारी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी मोठे हळकुंड, मध्यम, लहान कणी, त्याचप्रमाणे गड्डे, सोरा गड्डा अशी वेगवेगळ्या प्रकारामध्ये प्रतवारी करून तयार माल विक्रीसाठी मार्केटला पाठवावा. पतवारी न करता विक्रीस पाठविल्यास मालास योग्य भाव मिळत नाही, परिणामी आर्थिक नुकसान होते.